महाराष्ट्र विधानसभा

तिसरे अधिवेशन, २०१७

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

मौजे वरवंड (ता.दौंड, जि.पुणे) येथील वन विभागाची जागा गावठाण विकासासाठी ग्रामपंचायतीस देण्याबाबत

(१) २८५६५ (२०-०१-२०१६). श्री.राहूल कुल (दौंड) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वरवंड (ता.दौंड, जि.पुणे) येथील वन विभागाची जागा गट नं.२१०४ मधील ३.४७ हेक्टर क्षेत्र गावठाण विकासासाठी ग्रामपंचायतीस देण्याबाबतचे निवेदन मा.ग्रामविकास राज्यमंत्री यांना माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (२४-०५-२०१७) :(१) मौज वरवंड, ता.दौंड, जि.पुणे येथील वन विभागाची जागा गावठाण विकासासाठी ग्रामपंचायतीस देण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये व त्या दरम्यान मा.ग्रामविकास राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना दिल्याबाबतची माहिती आढळून येत नाही.

तथापि, ग्रामपंचायत वरवंड यांनी त्यांचेकडील पत्र दिनांक १८.१२.२०१३ अन्वये मौजे वरवंड येथील फॉ.ग.नं. २०१४ मधील ३.४७ हेक्टर इतक्या वनक्षेत्राची मागणी केली आहे.

(२) उपरोक्त मागणीच्या अनुषंगाने वन क्षेत्राचा वनेत्तर कामासाठी वापर करावयाचा असल्याने त्यासाठी वन (संवर्धन), १९८० अंतर्गत प्रस्ताव करुन त्यास केंद्र शासनाची मंजूरी प्राप्त करुन घ्यावी लागेल अस वरवंड ग्रामपंचायतीस कळविण्यात आले आहे.

तथापि, ग्रामपंचायत वरवंड, ता.दौंड, जि.पुणे यांचेकडून वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत प्रस्ताव अद्याप प्राप्त झालेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक व उल्हासनगर (जि.ठाणे) येथील बालसुधारगृहातून मुलांनी पलायन केल्याबाबत

(२) ४५७३९ (३०-०४-२०१६). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) : सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक व उल्हासनगर (जि.ठाणे) शहरातील किशोर सुधारगृहातून मुले पलायन करीत असल्याने राज्यातील बाल सुधारगृहातील गैरसोयी व असुविधांचा प्रश्न ऐरणीवर आला असल्याची बाब दिनांक १३ जानेवारी, २०१६ रोजीच्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेची चौकशी करण्यास मुंबई हायकोर्टाने एका सत्यशोधन समितीची स्थापना केली असून सदर समितीने हायकोर्टात अहवाल सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, न्यायालयाने राज्य शासनास सुधारणा करण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर मुंबईतील बालगृहात क्षमतेपेक्षा जास्त मुलांना ठेवले जात असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मुलांच्या या पलायनामुळे सुरक्षितता व अपुऱ्या सोयी सुविधांचा तसेच शासनाकडून मिळणारा अपुऱ्या निधीचा प्रश्न ऐरणीवर आला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाच्या वतीने कोणती उपाय योजना करण्यात आलेली आहे वा करण्यात येणार आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (२९-०४-२०१७) :(१) गृह विभागाच्या अखत्यारितील नाशिक किशोरसुधारगृहातून मुले पळून गेल्याची घटना जानेवारी, २०१६ मध्ये घडली होती. उल्हासनगर येथील बालगृहातून मुलांनी पलायन केलेली कोणतीही घटना घडलेली नाही.

(२) नाही.

(३), (४), (५), (६) व (७) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात नवीन बालगृहे उभारण्याच्या निर्णयाबाबत

(३) ५४००० (२४-०८-२०१६). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा),

श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) : सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सध्या असलेल्या बालगृहांच्या तीन वर्षापासूनच्या प्रलंबित भोजन अनुदानासाठी निधीची कमतरता आहे असे सांगणा-या महिला व बालविकास विभागाने नुकतेच माहे एप्रिल, २०१६ मध्ये नवीन बालगृहे उभारणीचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील प्रत्येक तालुक्यात २५ मुलांसाठी एक या हिशेबाने सुमारे ३०० ते ३५० नवीन शेल्टर होम (निवारा गृहे) सुरु करण्याचा प्रस्ताव आयुक्तालय स्तरावर मागविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू नवीन बालगृहे राज्यात यावर्षी अखेरीपर्यंत सुरु करण्याचा महिला व बालविकास विभागाचा मानस आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त विभागाने प्रलंबित भोजन अनुदानासाठी निधीची कमतरता असतांनां नवीन बालगृहे उभारण्यामागची नेमकी भूमिका काय आहे,

(५) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (२०-०४-२०१७) :(१) नाही.

(२) नाही.

(३), (४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

बजेट डिस्ट्रीब्युशन सिस्टीम (बी.डी.एस) प्रणालीद्वारे वेळेत निधी उपलब्ध न झाल्याबाबत

(४) ५५०४७ (११-०८-२०१६). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) : सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बजेट डिस्ट्रीब्युशन सिस्टीम (बी.डी.एस) प्रणालीद्वारे वेळेत निधी उपलब्ध न झाल्याने जलसंधारण विभागास कोट्यवधी रुपयाचा निधी उपलब्ध न झाल्याने कोल्हापूर जिल्ह्याला २० कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच दिनांक ३१ मार्च, २०१६ रोजीपर्यंत बी.डी.एस.द्वारे निधी न मिळाल्यामुळे जिल्ह्यातील २५० कोटी रुपयांचा निधी व्यपगत झाला असल्याने संपूर्ण राज्यासह कोल्हापूर जिल्ह्यातील अनेक लघुपाटबंधाऱ्यांची कामे निधी अभावी प्रलंबित राहणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले आहे,
(४) असल्यास, चौकशीनुसार निधी वाया जाण्याची कारणे काय आहेत व त्यास जबाबदार असणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. राम शिंदे (२३-०३-२०१७) :(१) नाही, हे खरे नाही.

सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी मागणी क्र. एल-७ लेखाशिर्ष ४४०२ १२२८ खाली रु.७००.०० लक्ष (रु.सात कोटी फक्त) इतका निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला होता. तथापि, महाराष्ट्र जलसंधारण अधिनियम २००० च्या कलम २५(१) मध्ये सुधारणा झाल्याशिवाय सदर निधी उपलब्ध करुन देण्यास वित्त विभागाने असमर्थता व्यक्त केल्याने रु.७००.०० लक्ष निधी प्रत्यार्पित करण्यात आला.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील स्वयंसेवी संस्थेने केलेल्या सर्वेक्षणात सिंग्नल, रेल्वेस्थानक आणि पर्यटनस्थळी भीक मागणारी ६५१ मुले आढळल्याबाबत

(५) ५५८३१ (२४-०८-२०१६). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) : सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील स्वयंसेवी संस्थेने केलेल्या सर्वेक्षणात सिंग्नल, रेल्वेस्थानक आणि पर्यटनस्थळी भीक मागणारी ६५१ मुले आढळली असून यापैकी ४७ टक्के मुले भीक मागत असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यापैकी काही मुले आपल्या आईवडीलांसोबत होती परंतु ६६ टक्के मुले ही कुणाचा आधार नसलेली ६ ते १४ या वयोगटातील असून यापैकी ५३ टक्के मुलेही शाळेत जाणारी नाहीत तरी या निराधार मुलांच्या भविष्यात विचार करता शासन त्वरीत आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (१९-०४-२०१७) :(१) दि.०१ मे, २०१६ दै.लोकसत्ता मध्ये प्रसिध्द झालेल्या वृत्तानुसार, मुंबईतील विशेषत: दक्षिण मुंबईतील सिग्नल, रेल्वेस्थानके आणि पर्यटनस्थळे यांच्या आसपास असणाऱ्या मुलांचे सर्वेक्षण "प्रथम" या स्वयंसेवी संस्थेने केले असल्याचे दिसून येते. परंतु, स्वयंसेवी संस्थेचा अहवाल शासनास प्राप्त झालेला नाही.

(२) बालकामगार, बालभिक्षेकरी यांचे पुनर्वसन करण्याच्या अनुषंगाने मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यात कृतिदलाची (TASK FORCE) स्थापन करण्यात आली आहे. त्यामध्ये जिल्ह्यातील कामगार आयुक्त, तसेच जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी मुंबई शहर / मुंबई उपनगर ह्या जिल्ह्यातील जिल्हा संरक्षण पोलीस पथक (JAPU) तसेच बाल कल्याण समिती व बालकांसाठी काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था यांना समाविष्ठ करुन कृतिदल स्थापन करण्यात आले आहे. धाडसत्रात मुक्त करण्यात आलेल्या बालकांना बाल कल्याण समिती समोर दाखल करण्यात येते व त्या नंतर बाल न्याय (मुलांची काळजी वा संरक्षण) अधिनियम २०१५ अंतर्गत असलेल्या तरतुदीनुसार ६ ते १४ वयोगटातील बालकांना संस्थेत दाखल केले जाते. संस्थेत दाखल झाल्यानंतर त्यांना अन्न, वस्त्र, निवारा, संरक्षण, शिक्षण, प्रशिक्षण, वैद्यकिय उपचार मनोरंजन, खेळ, आणि समुपदेशन करुन त्यांचे पुनर्वसन करण्यात येते. कुंटुंबासोबत असणाऱ्या परंतु भिक मागणाऱ्या बाल भिक्षेकऱ्यांच्या पालकांना देखील धाडसत्रात पकडण्यात येते. बालकांबरोबर त्यांच्या पालकांना देखील सहआरोपी करण्याची प्रक्रिया चालु आहे. एप्रिल, २०१६ ते नोव्हेंबर, २०१६ अखेर मुंबई शहर व मुंबई उपनगर या दोन जिल्ह्यातील बाल कल्याण समितीमार्फत ५३ बाल भिक्षेकरी (मुले व मुली) संस्थेत दाखल करण्यात आलेले होते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील चेंबूरमध्ये पेस्तम सागर येथे महिलांसाठी आधार केंद्र बांधण्यास जिल्हाधिकारी कार्यालयातून ना-हरकत प्रमाणपत्र न मिळाल्याबाबत

(६) ५६००३ (२४-०८-२०१६). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.सुभाष साबणे (देगलूर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) : सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील चेंबूरमध्ये पेस्तम सागर येथे महिलांसाठी आधार केंद्र बांधण्यास दोन वर्षापासून जिल्हाधिकारी कार्यालयातून ना-हरकत प्रमाणपत्र न मिळाल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सदर प्रस्तावावर निर्णय घेऊन सदर महिला आधार केंद्र स्थापण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (२४-०४-२०१७) :(१) नाही.

पेस्तम सागर, चेंबूर, मुंबई येथे महिलांसाठी आधार केंद्र बांधण्यास ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतचा कोणताही प्रस्ताव प्राप्त झालेला नाही. तथापि, सहायक आयुक्त, एम/पूर्व विभाग यांच्याकडून एम/पूर्व विभागातील पांजारपोळ या ठिकाणी महिलांकरीता प्रशिक्षण घेण्यासाठी

तसेच महिला बचतगटाच्या कामांकरीता महिला आधार केंद्र बनविण्याकरीता ना-हरकत प्रमाणपत्र मिळण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे कार्यालयास दिनांक ०६.०४.२०१५ रोजी प्राप्त झाला होता.

(२) जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचेकडून सहायक आयुक्त, एम/पूर्व विभाग यांच्याकडील प्रस्तावाच्या अनुषंगाने तहसिलदार, कुर्ला व नगर भूमापन अधिकारी, चेंबूर यांच्याकडून अहवाल प्राप्त करुन घेण्यात आले होते. नगर भूमापन अधिकारी, चेंबूर यांच्या अहवालानुसार न.भू.क्र.६७८/२००२ च्या मिळकत पत्रिका पाहता, धारक सदरी राष्ट्रीय केमिकल ॲन्ड फर्टीलायझर लि. यांचे नाव असून अता/भूसंपदान मो.र.नं. ३९०/२०१२ अन्वये सदर क्षेत्राची संयुक्त मोजणी झाली असल्याचे त्यांचे अहवालात कळविले आहे.

सहायक आयुक्त, एम/पूर्व विभाग यांनी महिला आधार केंद्र बनविण्याकरीता मागणी केलेली जमिन महाराष्ट्र शासनाच्या मालकीची नसल्यामुळे सदरच्या जमिनीवर महिला आधार केंद्र बनविण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाची ना-हरकत प्रमाणपत्र देता येत नसल्याबाबत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी त्यांच्या दिनांक ०२.१२.२०१५ अन्वये सहायक आयुक्त, एम/पूर्व विभाग यांना कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर मेडिकल रुग्णालयामध्ये गत वर्षभरात ५५० बालकांचा जन्माच्या वेळीच मृत्यू झाल्याबाबत

(७) ५६०९७ (२०-०८-२०१६). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूरमधील मेडिकल रुग्णालयामध्ये गत वर्षभरात (दिनांक १ जानेवारी, २०१५ ते दिनांक ३१ मार्च, २०१६) ११ हजार ५६४ बालकांचा जन्म झाला मात्र यातील ५५० बालकांचा जन्माच्या वेळीच मृत्यू झाला असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर मधील उपजत बालमृत्यू रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (१९-०४-२०१७) :(१) व (२) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथे दिनांक १ जानेवारी, २०१५ ते दिनांक ३१ मार्च, २०१६ या कालावधीत २०७५५ बालकांचा जन्म झाला आहे.

संस्थेमध्ये प्रसुतीसाठी येणाऱ्या मातांची संख्या अधिक आहे. तसेच, स्टिल बर्थ होण्याची शक्यता असलेल्या महिलांना प्रसुतीसाठी अन्य रुग्णालयांतून संस्थेकडे संदर्भांकित करण्यात येते. वेळोत दाखल होणाऱ्या अशा महिलांना तात्काळ भरती करुन विशेष निरिक्षण व उपचार

करण्यात येतात. तथापि, असे रुग्ण बहुदा शेवटच्या क्षणी रुग्णालयात दाखल होत असल्याने अशा प्रकारचे उपचार करणे शक्य होत नाही. वरील कारणास्तव तसेच, गुंतागुंतीची प्रसुती, जन्मजात व्यंग, मुदतपुर्व प्रसुती यामुळे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, व रुग्णालय, नागपूर येथे मृतावस्थेत जन्मलेल्या बालकांची संख्या ४८८ इतकी आहे.

नवजात बालकांचा मृत्यू रोखण्याकरिता आवश्यक ते सर्व औषधोपचार, सोयी सुविधा तसेच तज्ञ डॉक्टर शासकीय सैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथे उपलब्ध आहेत. मुदतपुर्व प्रसुती झालेल्या वा गंभीर प्रकृती असलेल्या नवजात बालकाला पी.आय.सी.यु. व एन.आय.सी.यु. विभागांमध्ये स्थलांतर करुन उपचार केले जातात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

सिल्लोड (जि.औरंगाबाद) तालुक्यात जलयुक्त शिवाराची कामे करण्यासाठी लागणाऱ्या जेसीबी मशिन्स गायब झाल्याबाबत

(८) ५७२०५ (२४-०८-२०१६). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) : सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयातील सिल्लोड तालुक्यात जलयुक्त शिवाराची कामे करण्यासाठी लागणाऱ्या जेसीबी मशिन्स गायब होऊन सदर कामांसाठी नेमलेल्या अधिकारीही कामावर हजर नसल्याचे ग्रामस्थांनी उपविभागीय अधिकारी, सिल्लोड, सोयेगाव (जि.औरंगाबाद) यांच्याकडे माहे एप्रिल, २०१६ मध्ये लेखी तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तक्रारीच्या अनुषंगाने याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, सदर चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने दोषीवर कोणती कारवाई करण्यात आली आहे,

(३) असल्यास, अद्याप तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. राम शिंदे (०३-०४-२०१७) :(१) होय, हे खरे आहे.

(२) कार्यकारी अभियंता यांत्रिकी विभाग क्र.२ औरंगाबाद यांनी प्रस्तुत प्रकरणी खुलासा केला असून सदर प्रकरणा तथ्य आढळून आले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

वसई (जि.पालघर) येथील बालगृहात अल्पवयीन मुलींचा शारिरीक आणि मानसिक छळ होत असल्याबाबत

(९) ५७५९१ (२४-०८-२०१६). श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) येथील "हॅण्ड्मेड्स ऑफ द व्लेस्ड रीनीटी रोझा मिस्कीटा कॉन्हेवेंट" बालगृहाच्या दासेन सिस्टर्स विरोधात अल्पवयीन मुलींचा शारीरिक आणि मानसिक छळ होत असल्याचे माहे एप्रिल २०१६ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच, बालगृहामध्ये शिळे आणि नासलेले अन्न दिले जात असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी बालगृहाची शासन चौकशी करणार आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (१९-०४-२०१७) :(१) होय.
(२) होय.
(३) सदरच्या बालगृहास महिला व बाल विकास विभागाची मान्यता नाही. तथापि, सदर प्रकरणी बाल विकास प्रकल्प अधिकारी भिवंडी निजामपूर (नागरी) यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठित करुन चौकशी करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांच्या पथकांकडून राज्यातील स्वयंसेवी बालगृहांची करण्यात आलेली तपासणी

(१०) ५८७४६ (२४-०८-२०१६). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), ॲड.वारीस पठाण (भायखळा) : सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील बालगृहे तपासणी करण्याचे निर्देश, दिनांक २९ एप्रिल, २०१६ रोजी पुण्यातील महिला व बालकल्याण आयुक्तालय विभागात बैठकीमध्ये जिल्हानिहाय पथके तयार करुन देण्यात आले तसेच विभागाच्या पुणे, नागपुर, औरंगाबाद, नाशिक, अमरावती, कोकण उपविभागीय उपायुक्त कार्यालयाने कार्यक्षेत्रातील जिल्हा महिला व बालविकास अधिकाऱ्यांना चार सदस्यीय तपासणी पथके तयार करुन आठ दिवसात तपासण्या करुन माहे मे, २०१६ वा त्यादरम्यान आयुक्तांना अहवाल सादर करण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१५ च्या ऑगस्ट-सप्टेंबर मध्ये महसूल विभागाच्या पथकाकडून राज्यातील स्वयंसेवी बालगृहांची दोनशे गुणांची व्यापक तपासणी मोहीम राबविण्यात येऊन तपासणी नंतर बालगृहांना गुणांकन देण्यात आले, त्याचबरोबर "अ" व "ब" गटात मोडणाऱ्या बालगृहांना प्रलंबित अनुदान देण्यात येणार होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) मधील तपासणीमध्ये कोणकोणत्या बाबी आढळून आल्या आहेत,

(४) उक्त प्रकरणी शासनामार्फत कोणती कारवाई करण्यात आलेली आहे वा प्रस्तावित आहे,
(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे कोणती ?

श्रीमती पंकजा मुंडे (२०-०४-२०१७) :(१) जिल्हानिहाय पथके आयुक्तालय स्तरावरुन गठीत करण्यात आलेली नसून विभागीय उपआयुक्त यांना त्यांचे स्तरावरुन पथके गठीत करुन त्यांचे अधिनस्त जिल्ह्यातील बालगृहांची तपासणी करणे बाबतच्या सुचना दिनांक २९ एप्रिल, २०१६ च्या आयुक्तालयात पार पडलेल्या बैठकीमध्ये देण्यात आल्या होत्या.
(२) महसूल विभागाच्या पथकाकडून राज्यातील स्वयंसेवी बालगृहांची दोनशे गुणांची व्यापक तपासणी मोहिम राबविण्यात येऊन बालगृहांना गुणांकन देण्यात आले हे खरे आहे. तथापि, "अ" व "ब" गटात मोडणाऱ्या बालगृहांना प्रलंबित अनुदान देण्यात येणार होते हे खरे नाही.
(३) प्रश्न भाग १ मधील संदर्भाधिन तपासणीमध्ये विभागांतर्गत कार्यरत स्वयंसेवी संस्थांमधलील बहुतांश प्रवेशित उन्हाळी सुट्ट्यांसाठी पालकाकडे कुंटूंबात गेल्याचे निदर्शनास आलेले आहे.

तर प्रश्न भाग २ मधील तपासणीमध्ये ९६३ पैकी २१४ संस्थांना "क" व "क पेक्षा कमी" दर्जा प्राप्त आहे.
(४) प्रश्न भाग १ मधील संदर्भाधिन तपासणी अन्वये प्राप्त झालेल्या निष्कर्षामुळे दिनांक ०१ जून, २०१६ अन्वये आयुक्तालय स्तरावरुन परिपत्रक काढण्यात आलेले असून बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ च्या कलम २ (१४) मध्ये मोडणाऱ्या बालकांनाच प्रवेश देणे बाबतच्या सूचना सदर परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या आहेत.

तर प्रश्न भाग २ मधील संदर्भाधिन तपासणी सद्यस्थितीत न्यायप्रविष्ट आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील महिला व बालविकास विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या बालसंगोपन समितीबाबत

(११) ६०४९८ (२४-०८-२०१६). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) : सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महिला व बालविकास विभागाच्या शासन निर्णयानुसार राज्यात प्रत्येक महसुली विभागात तसेच शहरपातळीवरील वॉर्डामध्ये बालसंगोपन समिती असणे अनिवार्य आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशा एकूण किती समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत, त्याचे स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, सदर समितीमार्फत बालकांच्या समस्यांच्या सोडवणूकीसाठी कोणते प्रयत्न करण्यात आले वा येत आहेत,
(४) सदर समित्यांना पाठबळ पुरविण्यासाठी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (१९-०४-२०१७) :(१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे शहरात अनुदान घेऊन चालविल्या जात असलेल्या अनाथ मुलांच्या घरटे प्रकल्पाची अवस्था दयनीय असल्याबाबत

(१२) ६१२४७ (२४-०८-२०१६). श्री.योगेश टिळेकर (हडपसर) : सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरात अनुदान घेऊन चालविल्या जात असलेल्या अनाथ मुलांच्या घरटे प्रकल्पाची अवस्था अत्यंत दयनीय असल्याची बाब महिला व बाल कल्याण समितीने दिलेल्या भेटीत आढळून आले, हे खरे आहे काय
(२) तसेच अनाथालयात निकृष्ट अन्न, शौचालय व स्नानगृहांची दुरवस्था, मुलांची शारीरिक स्वच्छतेची दयनीय अवस्था अशा अनेक गोष्टी भेटीत आढळून आल्या, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (२०-०४-२०१७) :(१) व (२) नाही.
(३) पुणे महानगरपालिकेच्या समाज विकास विभागामार्फत पुणे शहर हद्दीतील रस्त्यावरील कुटूंबातील मुलांकरिता तीन ठिकाणी स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने "घरटं" प्रकल्प राबविण्यात येत आहे. या प्रकल्पाकरिता संपूर्ण अर्थसहाय्य पुणे महानगरपालिकेमार्फत करण्यात येते. महिला व बाल कल्याण समिती, पुणे महानगरपालिका यांनी येरवडा येथील "घरटं" प्रकल्पास भेट दिली व या ठिकाणी उपलब्ध करण्यात येणाऱ्या सुविधांबाबत सुचना दिल्या. समितीने दिलेल्या सूचनांच्या अनुषंगाने संबंधित संस्थांना पुणे महानगरपालिकेमार्फत आवश्यक त्या सुधारणा करणेचे आदेश देणेत आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

अकोला जिल्हातील अंगणवाडी व बालवाडी कर्मचाऱ्यांना वाढीव भत्ता लागू करण्याबाबतचे आंदोलन

(१३) ६२९३१ (२४-०८-२०१६). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) : सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य अंगणवाडी, बालवाडी कर्मचारी युनियनच्या अकोला शाखेने अकोला जिल्हा परिषदे समोर प्रवास भत्ता थकीत बिल, रिक्त जागा भरण्याबाबत व वाढीव मानधन लागू करणेबाबत माहे जुनच्या चौथ्या आठवड्यात धरणे आंदोलन केले व निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांच्या निवेदनावर शासनाने काय कार्यवाही केली,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (१८-०४-२०१७) :(१) होय.

(२) महिला व बाल कल्याण विभाग, जिल्हा परिषद, अकोला अंतर्गत प्रकल्प कार्यालयात कार्यरत अंगणवाडी सेविका/ मदतनीस / मिनी अंगणवाडी सेविका प्रवास भत्ता देयक तसेच मानधन अदा करण्यासाठी आवश्यक निधी आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांचेकडून उपलब्ध करुन देण्यात आला आहे. अकोला प्रकल्प अंतर्गत कार्यरत अंगणवाडी सेविका / मदतनीस / मिनी अंगणवाडी सेविका यांची रिक्त पदे भरणेबाबतची कार्यवाही प्रकल्प स्तरावर सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

माटुंगा (मुंबई) येथील डेव्हिड ससून बाल सुधारगृहात मुलांवर होणारे अत्याचार

(१४) ६३७६० (२४-०८-२०१६). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माटुंगा येथील डेव्हिड ससून बालसुधारगृह व औद्योगिक शाळा असलेल्या संस्थेत अल्पवयीन मुलांवर अत्याचाराचे प्रमाण वाढले असल्याची बाब माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे येथील राबाडी पालीस ठाण्यातील एक गुन्हेगार चोरीच्या आरोपाखाली डेव्हिड ससूनमध्ये दाखल झाल्यानंतर दुसऱ्या अल्पवयीन आरोपीला धमकावून दिनांक २९ मे व दिनांक १ जून, २०१६ या दिवशी त्यांच्यावर अनैसर्गिक अत्याचार केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशी काय आढळून आले व त्यानुसार अशाप्रकारांना प्रतिबंध घालण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे ?

श्रीमती पंकजा मुंडे (२०-०४-२०१७) :(१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) बाल न्याय मंडळ ठाणे यांचे आदेशान्वये दाखल बाल अपचारी यांचे विरोधात दि.०८.०६.२०१६ रोजी शिवाजी पार्क पोलीस ठाणे येथे कलम ३७७,५०६ भा.दं.वि.कलम ४, ८, १२ बालकांचे लैंगिक शोषणापासून प्रतिबंध अधिनियम २०१२ (Protection of Children From Sexual Offences Act २०१२) अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, मुंबई शहर यांनी सदर संस्थेस भेट देऊन चौकशी केली आहे. कर्मचारी व प्रवेशितांचे जबाब घेतले आहेत. तसेच, अशा प्रकारांना प्रतिबंध घालण्याच्या दृष्टीने संस्थेतील या घटनेच्या वेळसे कर्तव्यावर हजर असणारे ०४ रक्षक कर्मचारी व ०२ मार्गदर्शक कर्मचारी यांना दि.०८.०६.२०१६ रोजी "कारणे दाखवा" नोटीस बजावण्यात आली आहे. तसेच, अशा प्रकारांना प्रतिबंध घालण्यासाठी बालकांचे समुपदेशन करण्यात येत असुन, त्यासाठी विविध अशासकीय संस्थांचे सकहार्य घेतले जात असुन, अशा घटना संस्थेत पुन्हा घडू नयेत म्हणून याबाबत कर्मचाऱ्यांनासुध्द त्यांच्या कामात अधिक सतर्कता घेण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

मुंबई शहरातील उमरखाडी ऑब्झर्वेशन होम आणि डोंगरी चिल्ड्रन्स होमच्या दुरवस्थेबाबत

(१५) ६३८४५ (२४-०८-२०१६). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील उमरखाडी ऑब्झर्वेशन होम आणि डोंगरी चिल्ड्रन्स होम या चिल्ड्रन होममध्ये व्यवस्थित साफसफाई आणि मुलांच्या जेवणाकडे दुर्लक्ष होत असल्याचा प्रकारे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील चिल्ड्रन होमची पाहणी करण्यासाठी शासनाने एक समिती गठीत केली आहे काय,

(३) असल्यास, सदरील समितीच्या अहवालातून काय निष्पन्न झाले,

(४) तसेच प्रश्न भाग (१) प्रकरणी दोषी आढळून येणाऱ्या संबंधितांवर शासनाने काय कारवाई केली आहे,

(५) अद्याप कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (१९-०४-२०१७) :(१) नाही.

(२) मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी सुमोटो जनहित याचिका क्र.११५/२०१४ मध्ये त्रिसदस्यीय समिती गठित करुन आदेश पारित केले आहेत.

(३) उक्त समितीने स.स्थितीत निरीक्षणगृहातील सफाई व भोजन व्यवस्था समाधानकारक असलेबाबतचा अहवाल मा.न्यायालयास सादर केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील खासगी वैद्यकीय व दंत महाविद्यालयातील ८५ टक्के कोट्यातील प्रवेश राज्यातील विद्यार्थ्यांसाठी राखीव ठेवण्याचा शासनाच्या निर्णयाबाबत

(१६) ६५२७० (१६-१२-२०१६). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खासगी वैद्यकीय व दंत महाविद्यालयातील ८५ टक्के कोट्यातील प्रवेश राज्यातील विद्यार्थ्यांसाठी राखीव ठेवण्याचा शासनाचा निर्णय मा.मुंबई उच्च न्यायालयाने कायम ठेवला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खासगी वैद्यकीय व दंत महाविद्यालयातील १५ टक्के प्रवेश हे मॅनेजमेन्ट कोट्यातून भरण्यास मा.उच्च न्यायालयाने महाविद्यालयीन मॅनेजमेन्टला भरण्यास मुभा दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर १५ टक्के जागांसाठी महाविद्यालयाच्या मॅनेजमेन्टने प्रवेश देण्यापूर्वी विद्यार्थ्यांचे आधिवास प्रमाणपत्र बंधनकारक करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयात्मक आदेशाच्या अनुषंगाने प्रवेशाच्या प्रक्रियेच्या अंमलबजावणीची सद्यःस्थिती काय आहे ?

श्री. गिरीष महाजन (२४-०३-२०१७) :(१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे. १५ टक्के संस्थात्मक कोट्यातील (एन.आर.आय. विद्यार्थीधरुन) जागा ह्या महाविद्यालयाच्या व्यवस्थापनामार्फत भरण्यात येतात.

(३) नाही, हे खरे नाही. परंतू १५ टक्के संस्थात्मक कोट्यामध्ये एन.आर.आय. कोट्यातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास अखिल भारतीय स्तरावरील पात्र उमेदवार प्रवेश घेवू शकतात. त्यांना अधिवास प्रमाणपत्र बंधनकारक नाही.

(४) सन २०१६-१७ ची खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय व दंत महाविद्यालयाची प्रवेश प्रक्रिया दिनांक ०७ ऑक्टोबर, २०१६ रोजी संपुष्टात आली आहे.

राज्याचे बाल धोरण निश्चित करण्यासाठी समिती स्थापन करण्याबाबत

(१७) ६५३३९ (१०-०१-२०१७). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.विलासराव जगताप (जत) : सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याचे बाल धोरण निश्चित करण्यासाठी सन २००९ ते २०१४ या कालावधीत तत्कालीन महिला व बालकल्याण मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समितीने बाल धोरण बनविण्यासाठी काही मसुदा तयार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्या मसुद्यामध्ये बालकांच्या विकासासाठी नेमक्या काय उपाययोजना सुचविल्या आहेत,
(४) असल्यास, उक्त धोरणानुसार कार्यान्वित करण्याकरिता शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (१९-०४-२०१७) :(१) होय.
(२) होय.
(३) बाल धोरणामध्ये बालकांचे आरोग्य व पोषण, शिक्षण, बालकांचे मनोरंजन, बाल संरक्षण याबाबत तरतूदी करण्यात आलेल्या आहेत. तसेच हरवलेली बालके, काम करणारी बालके, स्थलांतरीत बालके, अनैतिक मानवी वाहतूकीस बळी पडणारी बालके, संस्थेतील बालके यांच्या विकासासाठी विशेष उपाययोजना सुचविण्यात आलेल्या आहेत.
(४) राज्याचे दुसरे बाल धोरण जाहिर करण्यासंदर्भात दिनांक ४ मार्च, २०१४ अन्वये शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्य शासनाने अंगणवाडीतील सेविका आणि मदतनीसांचे मानधन वाढीकरिता समिती नेमण्याबाबत

(१८) ६५३६७ (१०-०१-२०१७). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.वैभव पिचड (अकोले), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) : सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने अंगणवाडीतील सेविका आणि मदतनीसांचे मानधन वाढीकरिता समिती नेमली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या समितीने आपला अहवाल राज्य शासनास सादर केला आहे काय,
(३) असल्यास, या अहवालाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,
(४) असल्यास, याबाबत अहवालानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यांत येत आहे ?

श्रीमती पंकजा मुंडे (१७-०४-२०१७) :(१) होय.
(२) समितीचा अहवाल तयार करण्याचे काम सुरु असून अद्यापि समितीने अहवाल शासनास सादर केलेला नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील बोगस बालगृहांबाबत नवे धोरण राबविण्याबाबत

(१९) ६५३७५ (२७-०१-२०१७). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) : सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील बोगस बालगृहे आणि तेथील मुलांच्या पट पडताळणीच्या पार्श्वभूमीवर गरजू आणि अनाथ बालकांना न्याय मिळावा, बालगृहांच्या वसतिगृहाप्रमाणे उपयोग केला जाऊ नये यासंदर्भातील नवे धोरण राबविण्यासाठी बालहक्क आयोगाकडून मार्गदर्शक तत्वे मागविण्यात आलेली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रश्नी मार्गदर्शक तत्वे शासनास प्राप्त झालेली आहे काय व त्यानुसार कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(३) असल्यास, उक्त बोगस बालगृहांवर कारवाई करणे व अनाथ बालकांच्या सर्वांगिण विकासासाठी आवश्यक उपाययोजना करण्यासंदर्भात कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (१८-०४-२०१७) :(१) महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाकडून नवे बालगृह धोरण ठरविणेसाठी शासनाने मार्गदर्शक तत्त्वे मागविली नाहीत. तथापि, सन २०११ मध्ये राज्यशासनाने महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोग यांचेकडे बालगृह तपासणी अहवालाच्या अनुषंगाने त्यांचे शिफारशी देणेबाबत विनंती केली होती. आतापर्यंत एकूण २२ जिल्हयातील बालगृहांच्या अनुषंगाने आयोगाने शिफारशी शासनास सादर केलेल्या आहेत.
(२) व (३) राज्यातील महिला व बाल विकास विभागांतर्गत बालगृहांबाबत धोरण ठरविण्यात येत असून यासाठी टाटा सामाजिक विज्ञान संस्था यांचे सहाय्य घेण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे मांगली अरब (ता.नागभीड, जि.चंद्रपूर) येथील एकात्मिक बालविकास प्रकल्पातंर्गत अंगणवाडी सेविकेच्या भरती प्रक्रियेमध्ये बनावट कागदपत्र सादर केल्याबाबत

(२०) ६५४३० (१०-०१-२०१७). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) : सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मांगली अरब (ता.नागभीड, जि.चंद्रपूर) येथील एकात्मीक बालविकास प्रकल्पातंर्गत अंगणवाडी सेविकेची भरती प्रक्रियेमध्ये बनावट कागदपत्र सादर केलेल्या महिलेची नियुक्ती करण्यात आली असल्याची माहिती दिनाक २० ऑक्टोंबर २०१६ रोजी वा सुमारास निर्देशनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची तक्रार उप मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद चंद्रपूर यांच्याकडे केली असता त्यांनी महिला व बाल कल्याण अधिकारी यांना चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे आदेश दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी न करताच चौकशी अधिकाऱ्यांनी कागदोपत्री चुकीचा अहवाल तयार करुन वरिष्ठ अधिका-यांना सादर करुन बनावट कागदपत्राव्दारे निवड केलेल्या महिलेला वाचविण्याचा प्रकार केला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी करुन संबधितावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (१८-०४-२०१७) :(१) होय.

(२) व (३) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाल कल्याण), यांनी प्रस्तुत प्रकरणी सहा. संवर्ग विकास अधिकारी (उ.श्रे.) पंचायत समिती, मूल यांना चौकशी अहवाल सादर करण्याच्या सूचना दिलेल्या होत्या. त्यानुसार चौकशी अधिकारी यांनी संबंधित महिला उमेदवार सर्वाधिक गुण असल्यामुळे त्या पात्र ठरत असल्याने त्यांच्या निवडीची शिफारस केल्याचे अभिप्राय दिलेले आहेत. सदर अभिप्रायानुसार बाल विकास प्रकल्प अधिकारी, नागभिड यांनी संबंधित महिलेची अंगणवाडी सेविकेच्या मानधनी पदावर नियुक्ती केलेली आहे.

(४) यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांनी दिनांक १८/१०/२०१६ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये दिलेल्या आदेशानुसार उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाल कल्याण) व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.) यांनी पुन:श्च चौकशी केलेली असून सदर चौकशी अहवालानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

वर्धा जिल्हयातील महिला व बालविकास विभागाच्या अधिनस्त असलेल्या बालसुधारगृहातील अल्पवयीन मुलांचे लैंगिक शोषण होत असल्याबाबत

(२१) ६५४३४ (१०-०१-२०१७). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) : सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा जिल्हयातील महिला व बालविकास विभागाच्या अधिनस्त असलेल्या शासकीय निरीक्षण गृह तथा बालसुधारगृहातील काळजीवाहक गणेश राजमलवार यांनी अल्पवयीन मुलांचे लैंगिक शोषण माहे ऑगष्ट ते सप्टेंबर २०१६ मध्ये केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतची माहिती अधीक्षकांना देण्यात आली परंतु अधीक्षकांनी जाणीवपूर्वक कारवाई न करता हा प्रकार कुणालाही सांगू नये म्हणून बघणाऱ्या मुलाला बेदम मारहाण केली, हे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली काय चौकशीनुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (२०-०४-२०१७) :(१) होय,हे खरे आहे.

(२) व (३) अधिक्षक, शासकीय मुलांचे निरीक्षणगृह/बालगृह, वर्धा यांनी व्यक्तीश: मारहाण केलेली नाही. सदर प्रकरणी रोजंदारी तत्वावर कनिष्ठ काळजी वाहक म्हणून कार्यरत असलेले संबंधित कर्मचारी यांना दि.८.८.२०१६ पासून कामावरुन काढून टाकण्यात आलेले असून संस्थेचे अधिक्षक यांना आयुक्त, महिला व बाल विकास पुणे यांचे आदेश दि.१५.१०.२०१६ अन्वये दि.१०.८.२०१६ पासून पुर्वलक्षी प्रभावाने निलंबित करण्यात आलेले आहे.

तसेच संबंधित रोजंदारी कर्मचाऱ्यावर शहर पोलीस स्टेशन वर्धा येथे दि. ९/८/२०१६ रोजी ३७७, २९४, ३२३, ५०४, ५०६ भा.दं.वि. सहकलम ४,६,१२,१७,२१ मुलांचे लैगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम, २०१२ या कलमाखाली गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील मतीमंद मुलांच्या पुनर्वसनाबाबत

(२२) ६५४८२ (१०-०१-२०१७). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) : सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मतीमंद बालगृहांची जबाबदारी प्रशिक्षित तज्ञ नसल्याचे कारण देत महिला बाल विकास विभागाकडून दिनांक ३० मे २०१२ रोजी सामाजिक न्याय विभागाकडे हस्तांतरित करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सामजिक न्याय विभागाने अद्यापपर्यंत जबाबदारी न घेतल्याने बालगृहातील मतीमंद मुलांचे भविष्य अधांतरीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या मुलांच्या पुनर्वसनासाठी प्रत्येक जिल्ह्यात पाच जणांची बाल कल्याण समिती असून मात्र ठाणे, रायगड व मुंबईतील समितीमध्ये काही पदे रिक्त आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीनुसार राज्यातील मतीमंद मुलांच्या पुनर्वसनासाठी शासन कोणत्या उपाययोजना करणार आहे ?

श्रीमती पंकजा मुंडे (१८-०४-२०१७) :(१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) बाल कल्याण समितीमधील रिक्त पदाचा कार्यभार इतर जिल्हयातील बाल कल्याण समिती सदस्यांकडे देण्यात आला असून बाल कल्याण समितीचे काम सुरळीत चालेल याची दक्षता घेतली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात ५ वर्षापासून महाराष्ट्र राज्य बाल हक्क आयोग अस्तित्वात नसल्याबाबत

(२३) ६५५०० (२७-०१-२०१७). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.विलासराव जगताप (जत) : सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात ५ वर्षापासून महाराष्ट्र राज्य बाल हक्क आयोग अस्तित्वात नसल्याने तसेच त्याची स्थापना करण्याचे आदेश दिलेले असतानाही निर्देशाचे पालन केले नसल्याबद्दल मुंबई उच्च न्यायालयाने महिला व बाल कल्याण विभागाच्या अधिकाऱ्याविरुद्ध न्यायालयीन अवमानाची नोटीस बजावल्याचे माहे जुलै २०१६ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच, आयोगाचे अध्यक्ष व सदस्य यांचे मानधन वाढविण्याचे निर्देश असतानाही काहीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याच्या संबंधित अधिकाऱ्यावर कामात कसूर केल्यामुळे शासनाने काय कारवाई केली आहे,
(४) तसेच, कधीपर्यंत महाराष्ट्र राज्य बाल हक्क आयोग अस्तित्वात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (१८-०४-२०१७) :(१) व (२) नाही.

जनहित याचिका क्र.८४/२०१३,फोरम फॉर फेअरनेस इन एज्युकेशन विरध्द युनियन ऑफ इंडिया व इतर या याचिकेच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय,मुंबई यांनी दिनांक ०२.०४.२०१६ रोजी दिलेल्या आदेशात राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे अध्यक्ष व सदस्य यांचे मानधन केंद्रीय बाल हक्क आयोगाच्या अध्यक्ष व सदस्य यांच्या मानधनाप्रमाणे देणे बाबत योग्य तो निर्णय घेण्यात यावा, अशा सूचना दिल्या होत्या. सदर आदेशाच्या अनुषंगाने मानधनात वाढ करणे बाबतची कार्यवाही सुरु असतांना त्यासंदर्भात मा.उच्च न्यायालयाने अवमानाची नोटीस बजावली होती. तद् नंतर शासन निर्णय क्र.बाहआ-२००८/प्र.क्र.१७/का-९,दि.०१.०८.२०१६ अन्वये महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे अध्यक्ष व सदस्य यांच्या मानधनात वाढ करण्यात आली आहे. त्यास मा.उच्च न्यायालयाने मान्यता दर्शवून अवमान नोटीस डिसचार्ज (Discharge) केली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) व (५) बाल हक्क संरक्षण आयोगाच्या अध्यक्ष व सदस्य यांच्या नियुक्तीबाबतची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

गुहागर (जि.रत्नागिरी) येथील नाना-नानी पार्कची झालेली दुरवस्था

(२४) ६५९७५ (१६-०१-२०१७). श्री.भास्कर जाधव (गुहागर) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गुहागर (जि.रत्नागिरी) येथील समुद्रकिनारी सुरूबनासाठी लाखो रूपये खर्चून उभारण्यात आलेल्या नाना-नानी पार्कची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे सदर पार्कची दुरवस्था झाली असुन सदर पार्कचे पुनरूज्जीवन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (२९-०३-२०१७) :(१) हे खरे नाही.
(२) सदरहू पार्कमध्ये पर्यटकांना सुविधा पुरविण्याच्या दृष्टीने शासनाने सन २०१०-११ ते २०१५-१६ या कालावधीमध्ये एकुण रु. ११२.७१ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन दिला आहे. या अंतर्गत खालील कामे करण्यात आली आहेत.

i) नक्षत्र वन ii) रोपवाटीका तयार करणे iii) पर्यटकांसाठी बाके बसविणे iv) लहान मुलांसाठी खेळणी बसविणे v) पाण्यासाठी विहीर व पाईप लाईनची व्यवस्था करणे vi) तार कुंपण घालणे vii) निर्माल्य कलश बसविणे viii) माहिती दर्शक फलक लावणे ix) प्रवेशद्वार उभारणे x) पायवाट बांधणे इत्यादी

सदरहू पार्कच्या देखभाल व संरक्षणासाठी सन २०१५-१६ या आर्थिक वर्षामध्ये रु. ०.९२ लक्ष निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

सदरहू पार्कची देखभाल करण्यात येत असून दुरवस्था झालेली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील तृतीयपंथीय समाजाला शासकीय योजनांचा लाभ मिळणेकरिता आवश्यक उपाययोजना करण्याबाबत

(२५) ६६०३४ (१०-०१-२०१७). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील तृतीयपंथीयांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणून त्यांना सर्व शासकीय योजनांचा लाभ मिळावा याकरिता आवश्यक उपाययोजना करण्याची मागणी सामाजिक संघटनांनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक १५ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्या सुमारास वारंवार निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी तृतीयपंथीयांच्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (१८-०४-२०१७) :(१) होय.
(२) व (३) महाराष्ट्रातील सर्व तृतीयपंथीयांचे सर्वेक्षण करणे, तृतीयपंथायांसाठी जिल्हानिहाय कल्याणकारी बोर्ड स्थापन करुन त्यांना तृतीयपंथी असा दाखला व ओळखपत्र देण्यात यावे, अशा प्रकारे त्यांची मागणी आहे.

याबाबत या समाज घटकाची सर्वांगीण उन्नती व्हावी व त्यांना समाजाच्या विकास प्रवाहात आणले जावे, याकरिता दिनांक २८.०८.२०१४ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये राज्यस्तरीय व विभागीय स्तरीय तृतीयपंथी हक्कांचे संरक्षण आणि कल्याण मंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याअनुषंगाने शासन निर्णय क्र.तृतीपं-२०१४/प्र.क्र.४९/का-९, दिनांक ०६.०९.२०१४ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

आष्टी (जि.बीड) येथे उपजिल्हा रुग्णालय उभारण्याबाबत

(२६) ६६१९४ (१०-०१-२०१७). अॅड.भीमराव धोंडे (आष्टी) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आष्टी (जि.बीड) येथे उपजिल्हा रुग्णालय उभारण्यात यावे, अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे मा.लोकप्रतिनिधी यांनी मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने आष्टी येथे उपजिल्हा रुग्णालय उभारण्याबाबत शासनाकडून आजतागायत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत (१८-०४-२०१७) :(१) होय, हे खरे आहे.
(२) सन २००१ च्या लोकसंख्येच्या आधारावर आरोग्य संस्था स्थापनेचा बृहत आराखडा शासन निर्णय दि. १७ जानेवारी, २०१३ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. आष्टी येथे उपजिल्हा रुग्णालय उभारण्याबाबतचा प्रस्ताव शासनास दि. १४.६.२०१६ रोजी प्राप्त झाला आहे. राज्यातील आरोग्य संस्थाचा सुधारीत आराखडा तयार करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे. त्यात सदर प्रस्ताव विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

अकोले (जि.अहमदनगर) तालुक्यातील अकोले व राजूर येथील महिला व बालविकास प्रकल्पातील प्रकल्पाधिकारी यांची पदे रिक्त असल्याबाबत

(२७) ६६४९९ (१०-०१-२०१७). श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) : सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोले (जि.अहमदनगर) तालुक्यातील अकोले व राजूर येथील महिला व बालविकास प्रकल्पाधिकारी यांची पदे एक वर्षापासून रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच महिला व बालविकास प्रकल्पांतर्गत येणाऱ्या अंगणवाडी केंद्रामधील बालके कुपोषण मुक्त राहावे तसेच कर्मचाऱ्यांवर नियंत्रण राहावे याकरीता सदरची पदे तातडीने भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (१८-०४-२०१७) :(१) अकोले प्रकल्पातील बाल विकास प्रकल्प अधिकारी हे नियम वयोमानानुसार दि.३०/६/२०१६ रोजी सेवानिवृत्त झाल्याने सदर पद तेव्हापासून रिक्त आहे तर राजूर प्रकल्पात कार्यरत असलेले बाल विकास प्रकल्प अधिकारी हे दि.३१/७/२०१६ रोजी गट-अ पदावर पदोन्नत झाल्याने सदर पद तेव्हा पासून रिक्त आहे.

(२) बाल विकास प्रकल्प अधिकारी (ग्रामीण) अकोले व राजूर या रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार प्रकल्पात कार्यरत असलेल्या वरिष्ठ पर्यवेक्षिका यांचेकडे देण्यात आलेला आहे. प्रकल्पातील कामकाज सुव्यवस्थीत चालू असून अंगणवाडी केंद्रामधील बालके कुपोषण मुक्त होणेबाबत बालकांना आहार व आरोग्य विषयी मार्गदर्शन केले जात आहे.

गट-ब संवर्गातील पदोन्नती कोट्यातील ३३ पदे पदोन्नतीने दि.२९.१२.२०१५ रोजी भरण्यात आली आहेत. त्यानुसार अहमदनगर जिल्ह्यातील बाल विकास प्रकल्प अधिकारी ग्रामीण ची ४ पदे भरलेली आहेत. सरळसेवेच्या कोट्यातील गट-ब पदाकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या १४७ उमेदवाराची निवड यादीनुसार नियुक्ती देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच वित्त विभागाच्या मान्यतेनुसार सरळसेवेच्या कोट्यातील गट-ब च्या ४५ पदांसाठी सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेने महाराष्ट्र लोकसेवा आयोगास मागणीपत्र सादर करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

चामोर्शी (जि.गडचिरोली) तालुक्यात २ हजार ६६३ बालकांचे आधारकार्ड न काढण्यात आल्याबाबत

(२८) ६६८१४ (१०-०१-२०१७). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) : सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील चामोर्शी तालुक्यात ० ते ६ वर्ष वयोगटातील अंगणवाडी केंद्रात १४ हजार ५०१ बालके असून त्यातील ११ हजार ८३७ बालकांचे आधारकार्ड काढण्यात आले असून उर्वरित २ हजार ६६३ बालके आधारविनाच असल्याचे नुकतेच माहे सप्टेबर, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, तदनुसार शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (१८-०४-२०१७) :(१) अंशत: खरे आहे.

चामोर्शी तालुका हा चंद्रपूर जिल्हयामधे नसून गडचिरोली जिल्हयात आहे. गडचिरोली जिल्हयातील चामोर्शी तालुक्यात माहे डिसेंबर, २०१६ च्या अहवालानुसार ० ते ६ वयोगटातील १४२९३ इतकी बालके असून त्यापैकी १२९२१ बालकांचे आधारकार्ड काढण्यात आलेले आहे. उर्वरित बालकांचे आधारकार्ड कायमस्वरुपी ५ कॅम्पच्या माध्यमातून काढण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर येथील एकात्मिक बालविकास प्रकल्पांतर्गत गर्भवती माता ते किशोरवयीन मुलींना देण्यात येणारा पोषक (टीएचआर) आहार गुरांना दिला जात असल्याबाबत

(२९) ६६९०० (१०-०१-२०१७). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) : सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील एकात्मिक बालविकास प्रकल्पांतर्गत गर्भवती माता ते किशोरवयीन मुलीना देण्यात येणारा पोषक (टीएचआर) आहार बेचव असल्याने कोणीही लाभार्थी हा आहार खात नसल्याने या पोषक आहाराचा साठा गुरांना दिला असल्याचे नुकतेच माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोषक आहार बेचव असल्याने लाभार्थीचा आहार पशुखाद्य बनले असून शासनाचा कोटयावधीचा निधी वाया गेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) तदनुसार यास जबाबदार असणाऱ्या दोषी व्यक्तीवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (११-०५-२०१७) :(१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) लागू नाही.
(५) लागू नाही.

शिरुर (जि.पुणे) येथील बालगृहासाठी कायम स्वरुपी निवासी अधिक्षिका नेमण्याबाबत

(३०) ६७२९८ (१०-०१-२०१७). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) : सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हयातील शिरुर येथील शासकीय मुलांच्या बालगृहासाठी मागील ७ वर्षापासून अधिककाळ कायम स्वरुपी निवासी अधिक्षिका नसल्याने या ठिकाणी कायम स्वरुपी निवासी अधिक्षिका नेमण्याबाबत शिरुर शहरातील महिलांनी मा.पालक मंत्री पुणे यांच्याकडे दिनांक १८ ऑगस्ट २०१६ रोजी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या बालगृहामध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमरे बसविणे, संस्थेचे संरक्षक भिंतीची उंची वाढविणे, संस्थेतून शाळेत जाण्या-येण्यासाठी वाहन व्यवस्था करण्याबाबत विद्यार्थीनींना आवश्यक वस्तू, शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन देण्याबाबत या निवेदनात मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संस्थेतील वरिष्ठ लिपीकांने व त्याच्या मुलाने संस्थेतील मुलींवर अत्याचार केल्याचे प्रकरण निदर्शनास आले होते, हे ही खरे आहे काय
(४) असल्यास, शिरुर येथील बालगृहासाठी कायम स्वरुपी निवासी अधिक्षिका नेमणूकीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (१८-०४-२०१७) :(१) होय.
(२) होय.
(३) होय.
सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. तसेच सदर प्रकरणांबाबत विभागीय चौकशी सुरु आहे.
(४) अधिक्षिका पदाचा अतिरिक्त कार्यभार महिला परिविक्षा अधिकाऱ्यांकडे देण्यात आलेला आहे. महिला व बाल विकास आयुक्तालयांतर्गत गट-ब च्या मंजूर पदांपैकी रिक्त पदांचे प्रमाण अधिक आहे. सरळसेवा व पदोन्नतीच्या कोटयातून उपलब्ध अधिकाऱ्यांमधून विभागीय संवर्ग वाटप नियमानुसार रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

वाघोली (जि.पुणे) राहू रोडवरील बुर्केगाव व शिरसवडी यांच्या शिवेवरील असलेल्या वनक्षेत्रात अतिक्रमण केल्याबाबत

(३१) ६७३१२ (२७-०१-२०१७). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाघोली (जि.पुणे) राहू रोडवरील बुर्केगाव व शिरसवडी यांच्या शिवे वरील असलेले खाजगी गट नं.८२, ८४ येथे प्रिकास्ट लिमिटेड कडून २ हेक्टर वनक्षेत्रावर अतिक्रमण केल्याची बाब माहे ऑक्टोबर २०१६ मध्ये निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू वनक्षेत्रावर फेन्सिंग, तार कंपाऊंडसह रस्ते तयार करून वनक्षेत्रावर ताबा घेतल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (२३-०३-२०१७) :(१) मौजे बुर्केगाव व शिरसवडी या गावाच्या शिवेवरील मौजे बुर्केगाव येथील फॉ. स. नं. २० ची मोजणी वनसर्व्हेक्षक यांनी दिनांक २१.९.२०१३ ते दिनांक २८.९.२०१३ या कालावधीत केल्यानंतर शिरसवाडी हद्दीतील खाजगी गट नं. ८३ व ८४ येथील ३.६७ हेक्टर वनक्षेत्रावर (मे. प्रिकास्ट इंडिया इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि., पुणे) यांनी अतिक्रमण केल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) सदरहू वनक्षेत्रावर फेन्सिंग, तार कंपाऊंडसह रस्ते तयार करुन वनक्षेत्रावर ताबा घेतल्याचे निदर्शनास आले.

(३) मे. प्रिकास्ट इंडिया इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि., पुणे यांनी अतिक्रमण केल्याचे निदर्शसनास आल्यानंतर

(१) वनपरिक्षेत्र अधिकारी, पुणे यांनी संबंधितांविरुध्द दिनांक १५.१०.२०१३ व दिनांक २.३.२०१४ रोजी वनगुन्हा नोंदविला.

(२) त्यानंतर सहाय्यक वनसंरक्षक (ववसं), पुणे यांनी सदर वन गुन्हे कामी महाराष्ट्र महसूल संहिता, १९६६ चे कलम ५३ व ५४ अन्वये चौकशी करुन दिनांक २९.४.२०१६ रोजी अतिक्रमण निष्कासित करण्याबाबत आदेश दिले आहेत.

(३) या आदेशाविरुध्द मे. प्रिकास्ट इंडिया इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि., पुणे यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम २४७ अन्वये अपर आयुक्त, पुणे यांच्या न्यायालयात अर्ज दाखल केला होता.

(४) अपर आयुक्त, पुणे यांनी मा. न्यायालयाने वन विभागाची बाजू मान्य करुन अतिक्रमण हटविण्याबाबतचा पारीत केलेला अंतिम आदेश कायम करणेबाबतचा निर्णय दिनांक ३.१०.२०१६ रोजी दिला. या निर्णयाची अंमलबजावणी अपील कालावधीनंतर करणेबाबत आदेशीत केले.

(५) प्रकरणी अर्जदाराने मे.प्रिकास्ट इंडिया इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. विरुध्द मा.महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे न्यायालयात कॅव्हेट क्र. ८३५/२०१६, दिनांक २८.१०.२०१६ रोजी दाखल केले आहे.

(६) या अपिलाचे मुदतीचे कालावधीतच मे. प्रिकास्ट इंडिया इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि., पुणे यांनी अपर आयुक्त, पुणे यांचे निर्णयाचे विरोधात मा. उच्च न्यायालयात रिट याचिका क्र. १२९२५/२०१६, दिनांक १८.११.२०१६ दाखल केले आहे.

(७) त्याचप्रमाणे वन विभागाने सुध्दा मा. उच्च न्यायालयात कॅव्हेट अर्ज दिनांक १८.११.२०१६ रोजी दाखल केला असून त्यास क्र. ६०४०/१६ असा प्राप्त झाला आहे.

(८) प्रस्तुत प्रकरणी मा. उच्च न्यायालयात दिनांक २५.११.२०१६ रोजी सुनावणी होवून अपिलार्थी यांचे अपील निकाली काढण्यात आले आहेत.

(९) सदर प्रकरणी मा. न्यायालयाने मा. महसूल मंत्री यांचेकडे अपिलार्थी मे. प्रिकास्ट इंडिया इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि., पुणे यांनी दाखल केलेल्या स्थगिती अर्जावर दिनांक ३१.१.२०१७ पर्यंत निर्णय घेणेबाबत निर्देश दिले होते. त्यानुषंगाने याप्रकरणाचा स्थगिती अर्जाबाबतचा निकाल दिनांक २७.२.२०१७ रोजी मा. मंत्री (महसूल) यांनी पारित केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे जिल्हयातील भिंवडी बालसुधारगृहातील तीन मुलांनी पलायन केल्याबाबत

(३२) ६७६३९ (१०-०१-२०१७). ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील विविध पोलीस ठाणे अंतर्गत खून, बलात्कार चोरी सारख्या गंभीर गुन्हयाच्या आरोपाखाली बंदिस्त असलेल्या भिंवडी बालसुधारगृहातील मुलांनी, पोलीस कर्मचारी व सुरक्षा रक्षकांना खोलीत कोंडुन तीन मुलांनी दिनांक ३ ऑक्टोबर, २०१६ रोजी पलायन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार याप्रकरणी संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (२०-०४-२०१७) :(१) होय.

(२) होय.

(३) सदर घटनेची चौकशी निरीक्षणगृह स्तरावर करण्यात आली असून संस्थेतील विधीसंघर्षग्रस्त तीन प्रवेशित बालकांनी इतर प्रवेशितांमध्ये भांडणे लावून दिली होती. त्यावेळी कर्तव्यावर कार्यरत असलेले काळजीवाहक व संस्थेतील पोलिस कर्मचाऱ्यांनी भांडणे मिटवण्याचा प्रयत्न केला असता तीन विधीसंघर्षग्रस्त बालकांनी खोलीची बाहेरुन कडी बंद करुन व इमारतीचे पत्र तोडून पलायन केले. पोलिसांनी सदर मुलांचा शोध घेऊन पुन:श्च निरीक्षणगृहात दाखल केले आहे.

सदर घटनेस जबाबदार असलेल्या काळजीवाहकाकडून खुलासा मागविण्यात आला असून त्यांचे माहे ऑक्टोबर, २०१६ चे वेतनात कपात केली असून सन २०१७-१८ ची एक वेतनवाढ स्थगित केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील वृक्षरोपण कार्यक्रमात होत असलेला गैरव्यवहार

(३३) ६७७८४ (०९-०१-२०१७). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गेल्या सहा वर्षात पाचशे कोटी वृक्षरोपणाचे उद्दीष्ट असलेल्या वन विभागाने त्यासाठी सुमारे ९०० कोटीचा खर्च केला असून प्रत्यक्षात यातील वीस टक्केही झाडे जिवंत नसल्याचे माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या वृक्षारोपण कार्यक्रमात मोठ्या प्रमाणात अपहार होत असून शासनाने चौकशी करुन संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (३१-०३-२०१७) :(१) राष्ट्रीय वन धोरणा १९८८ व राज्य वन धोरण २००८ अन्वये, वन व वृक्षाच्छादनाचे ३३% करण्याचे उद्दिष्ट नमूद आहे. महाराष्ट्रातील वैज्ञानिक वनक्षेत्र ६१,५७९ चौ.कि.मी. म्हणजेच महाराष्ट्राच्या एकुण भौगोलिक क्षेत्राच्या (३०७७१३ चौ.कि.मी) २० % इतके आहे तत्कालीन मा. मुख्यमंत्री यांनी महाराष्ट्र राज्याच्या वतीने नवी दिल्ली येथे झालेल्या राष्ट्रीय विकास परीषदेमध्ये सन २०१२ ते २०१७ या पंचवार्षिक कालावधीत ५०० कोटी वृक्षलागवड करणार असल्याचे जाहिर केले होते. त्या अनुषंगाने वन विभागाद्वारे शासन परिपत्रक क्र. एफडीएम-२०११/प्र.क्र.१०४/फ-२, दि. २५.१०.२०११ अन्वये १०० कोटी वृक्षलागवड करणे ही महत्वकांक्षी योजना सन २०११-१२ पासून म्हणजेच २०१२ च्या पावसाळयात सुरु करण्यात आली. वन विभागाद्वारे ११ प्रादेशिक वनवृत्ता अंतर्गत वनक्षेत्रावर गेल्या ६ वर्षात करण्यात आलेली वृक्षलागवड व त्यावर झालेला खर्च व त्याच प्रमाणे जिवंत रोपांची टक्केवारी खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	वर्ष	लागवड केलेली रोपे (लाखात)	सरासरी जिवंत रोपांची टक्केवारी	झालेला खर्च (लाखात)
१	२०११	३४४.५३	५७.३७%	६७९०.२७
२	२०१२	७०३.३५	५६.३०%	१३३९३.५९
३	२०१३	५४७.८७	६५.१७%	१०६५०.६९
४	२०१४	५९७.७२	६७.८८%	१०२८९.७०

५	२०१५	४७३.८४	७६.९३%	११४४२.९२
६	२०१६	३९८.०१	९१.६०%	६६७६.५० (डिसें/१६ अखेर)
एकूण		**३०६५.३२**	**६९.२१%**	**५९२४६.६७**

वरील तक्त्यानूसार गेल्या ६ वर्षात ३०६५.३२ लाख रोपे लागवड करण्यात आली असून त्यावर रु. ५९२४६.६७ लक्ष खर्च झालेला आहे. वर्ष निहाय जिवंत रोपांची सरासरी टक्केवारी ६९.२१ इतकी आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

वाडा (जि.पालघर) तालुक्यातील अंगणवाडयांचे अनुदान व सेविकांचे मानधन प्रलंबित असल्याबाबत

(३४) ६७९७८ (१०-०१-२०१७). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) : सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि.पालघर) तालुक्यातील अंगणवाडयांना माहे मे, २०१६ पासून अद्यापपर्यंत अनुदान मिळालेले नाही तसेच अंगणवाडी सेविकांचे मानधनही अद्यापी मिळालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याची चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने अंगणवाडीचे अनुदान व सेविकांचे मानधन तात्काळ अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (१८-०४-२०१७) :(१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

तिवसा (जि.अमरावती) येथील ग्रामीण रूग्णालयात रूग्णांना औषधे मिळत नसल्याबाबत

(३५) ६८५११ (१०-०१-२०१७). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिवसा (जि.अमरावती) येथील ग्रामीण रूग्णालयात रूग्णांना औषधे मिळत नसल्याच्या तक्रारी असतानाही अनेक औषधांची पाकिटे इंजेक्शन जाळण्यात आल्या असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत जिल्हा शल्यचिकित्सक यांची परवानगी घेतलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय निष्पन्न झाले आहे व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत (११-०४-२०१७) :(१) व (२) हे खरे नाही.

ग्रामीण रुग्णालय, तिवसा, जि.अमरावती येथे कोणत्याही प्रकारची औषधे नष्ट करण्यात आलेली नाहीत. सदर रुग्णालयाच्या औषधी भांडारामधील अनावश्यक साहित्य (क्षयरुग्णांचे औषधांचे रिकामी ट्रिप्स, कागदी डब्बे, कचरा) जाळण्यात आलेले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

पन्हाळा (जि.कोल्हापुर) तालुक्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मानधनात झालेला गैरव्यवहार

(३६) ६८६६३ (२७-०१-२०१७). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) : सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पन्हाळा (जि.कोल्हापुर) तालुक्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या माहे ऑक्टोबर २०१४ ते एप्रिल २०१५ पर्यंतच्या मानधनात गैरव्यवहार असल्याचे माहे ऑगस्ट २०१६ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नूसार अंगणवाडी कर्मचाऱ्यांना सुधारित मानधन व दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आली आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (१७-०४-२०१७) :(१) होय.
(२) होय.
(३) बाल विकास प्रकल्प कार्यालय, पन्हाळा येथे कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्याकडे अनेक विषयांचे कामकाज व जिल्हा परिषद स्तरावरील विविध योजना तसेच पंचायत समितीकडील विविध योजना असल्याने अनावधानाने मानधनाच्या फरकाची रक्कम अदा करण्याचे काम राहिले होते. तथापि शासनाकडून सुधारित आर्थिक तरतूद प्राप्त झाल्यानंतर संबंधित अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या फरकाची रक्कम माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये त्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात आलेली आहे. याप्रकरणी कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार झालेला नसून संबंधित कर्मचाऱ्यांकडून विलंब झालेला होता. त्याबाबत संबंधित कर्मचाऱ्याला ज्ञापन देण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील डोळखांब येथील महिला व बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांचे पदे रिक्त असल्याबाबत

(३७) ६८९५० (१०-०१-२०१७). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) : सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील डोळखांब प्रकल्पांतर्गत २८३ गाव पाडयाचा समावेश असून महिला व प्रकल्प अधिकाऱ्यांचे पद तीन वर्षापासून रिक्त आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच महिला व बालविकास प्रकल्पांतर्गत येणाऱ्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांवर नियंत्रण राहावे म्हणून सदरचे पद तातडीचे भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (१८-०४-२०१७) :(१) होय.

(२) ग्राम विकास व जलसंधारण विभागाच्या दि.२८.५.२०१३ रोजीच्या शासन निर्णयाअन्वये ४४९ बाल विकास प्रकल्प अधिकारी (ग्रामीण) वर्ग-२ ची पदे या विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आलेली आहेत. सदर ४४९ पदांपैकी ३५५ पदे ही रिक्त स्वरुपात महिला व बाल विकास विभागाकडे वर्ग झालेली आहे.

(३) गट-ब पदाकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या १४७ उमेदवाराची निवड यादीनुसार नियुक्ती देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच वित्त विभागाच्या मान्यतेनुसार सरळसेवेच्या कोट्यातील गट-ब च्या ४५ पदांसाठी सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेने महाराष्ट्र लोकसेवा आयोगास मागणीपत्र सादर करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

बाल विकास प्रकल्प अधिकारी (ग्रामीण) शहापूर (डोळखांब), जि.ठाणे या रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार प्रकल्पात कार्यरत असलेल्या वरिष्ठ पर्यवेक्षिका यांचेकडे देण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

लोकसहभागाच्या माध्यामातून वनयुक्त शिवार योजना राबविण्याबाबत

(३८) ६८९६४ (०९-०१-२०१७). श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जलयुक्त शिवार योजनेच्या धर्तीवरच लोकसहभागाच्या माध्यामातुन वनयुक्त शिवार योजना राबविण्याचा व या योजनेअंतर्गत २ कोटी वृक्ष लागवड उद्दिष्ट साध्य करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेचे स्वरुप काय आहे व सदर योजनेची अंमलबजावणी करण्याचे दृष्टीने शासनाने काय नियोजन केले आहे,
(३) असल्यास, सदर योजनेची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे?

श्री. सुधीर मुनगंटीवार (२८-०२-२०१७) :(१) होय.
(२) या योजनेंतर्गत गाव शिवारातील उपलब्ध असलेल्या शासकीय, खाजगी व अशासकीय संस्थांच्या मालकीच्या वन व वनेत्तर जमीनीवर मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करणे.
(३) सन २०१७, २०१८ व २०१९ च्या पावसाळ्यात अनुक्रमे ४ कोटी, १३ कोटी व ३३ कोटी वृक्ष लागवड शासकीय, खाजगी व अशासकीय संस्था यांचे जमीनीवर वृक्ष लागवड लोकसहभागातून करावयाची आहे.

राज्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत

(३९) ६९२५० (१०-०१-२०१७). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड) : सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अंगणवाडी कर्मचा-यांनी त्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी प्रत्येक जिल्ह्यात माहे सप्टेंबर, २०१५ च्या सुमारास मोर्चाचे आयोजन केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांचे स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, शासनाने मागण्याबाबत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (१७-०४-२०१७) :(१) होय, हे खरे आहे.
(२) अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मागण्या या त्यांच्या मानधनवाढी बाबत, शासकीय कर्मचाऱ्यांच्या दर्जा मिळणेबाबत, भाऊबीज मंजूरीबाबत, इत्यादी स्वरुपाच्या आहेत.
(३) एकात्मिक बाल विकास सेवा योजना ही केंद्र शासनाची योजना असून केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या निकषांप्रमाणे राज्य शासनामार्फत राबविण्यात येते. त्यामुळे त्यांच्या मागण्याबाबत केंद्र शासनाकडून मार्गदर्शक सूचना प्राप्त झाल्यानंतर शासनस्तरावरुन निर्णय घेण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

केंद्र शासनाकडून व्हिलेज चाईल्ड डेव्हलपमेंट सेंटर योजनासाठी मिळणारे अर्थसहाय्य बंद असल्याबाबत

(४०) ६९९७१ (१०-०१-२०१७). श्री.विलास तरे (बोईसर) : सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) व्हिलेज चाईल्ड डेव्हलपमेंट सेटर या योजनेसाठी केंद्र शासनाकडून मिळणारे अर्थसहाय्य बंद झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पालघर सारख्या आदिवासी बहुल जिल्ह्यांमधील बालमृत्यू व मातामृत्यूंचे प्रमाण रोखण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती पर्यायी उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (११-०५-२०१७) :(१) हे खरे आहे.
(२) सन २०१६-१७ करीता पालघर जिल्हयातील एकूण १०,००० सॅम व मॅम श्रेणीतील मुलांसाठी प्रती बालक रक्कम रु. १२००/- प्रमाणे एकूण रु. १,२०,००,०००/- इतके अनुदान जिल्हा नियोजन समिती (DCP) नाविन्यपुर्ण उपक्रम अंतर्गत मंजुर झाले असून, सदर अनुदान तालुका स्तरावर वितरीत करुन ग्राम बाल विकास केंद्र (VCDC) माहे ऑगस्ट, २०१६ पासून सुरु करुन माहे डिसेंबर, २०१६ अखेर एकूण २७७४ ग्राम बाल विकास केंद्रात २१२९ सॅम व ७६७० मॅम असे एकूण ९७९९ कुपोषित मुलांना दाखल करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

सांगली जिल्ह्यातील पद्मभूषण वसंतदादा पाटील शासकीय रुग्णालयाचा दुरुस्तीचा प्रस्ताव

(४१) ७००९४ (१६-१२-२०१६). श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पद्मभूषण वसंतदादा पाटील शासकीय रुग्णालय, सांगली या रुग्णालयाच्या दुरुस्तीचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असल्याची बाब माहे सप्टेंबर २०१६ मध्ये निदर्शनास आली, हे खरे आहे काय
(२) असल्यास, या दुरुस्तीच्या प्रस्तावास सचिव समितीची मान्यता मिळाली असून देखील वैद्यकीय शिक्षण विभागाकडे हा प्रस्ताव प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत
(४) असल्यास, शासन या रुग्णालयाच्या दुरुस्तीच्या प्रस्तावास त्वरीत मंजूरी देऊन माहे डिसेंबर २०१६ च्या पुरवणी अर्थसंकल्पामध्ये याकरिता निधीची तरतुद करणार आहे काय ?

श्री. गिरीष महाजन (०४-०३-२०१७) :(१), (२) व (३) पद्मभूषण वसंतदादा पाटील शासकीय रुग्णालय, सांगली या संस्थेचा दुरुस्तीचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तांत्रिक छाननी तसेच सचिव समितीच्या मान्यतेसाठी सादर केला असता त्यांनी पुढील पर्यायासह प्रस्ताव परत पाठविला आहे.

१. एमओडब्ल्यूखाली प्रत्येक कामाला स्वतंत्र मंजूरी देवून निधीच्या उपलब्धतेनुसार टप्प्याटप्प्याने कामे हाती घेणे.

२. रुग्णालयाच्या आवारातील ठरावित विंग व्हाईज अंदाजपत्रक व नकाशे तयार करुन ते कामी हाती घेणे.

उपरोक्त पर्यायापैकी कोणता पर्याय स्विकारणे योग्य होईल, याबाबत संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन व संबंधित संस्थेचे अधिष्ठाता यांच्याकडून अभिप्राय मागविले आहेत. अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर प्रस्तावावर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

बृहन्मुंबईतील परळ येथील हाफकिन संशोधन संस्थेतील पीएचडी व एमएससीच्या विद्यार्थ्यांसाठी असलेली शिष्यवृत्ती बंद करण्याचा घेतलेला निर्णय

(४२) ७०१०२ (१६-१२-२०१६). श्री.अनिल (अण्णा) गोटे (धुळे शहर), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.अजय चौधरी (शिवडी) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबईतील परळ येथील हाफकिन संशोधन संस्थेतील पीएचडी व एमएससीच्या विद्यार्थ्यांसाठी असलेली शिष्यवृत्ती बंद करण्याचा निर्णय घेण्यात आल्याची बाब माहे ऑक्टोबर २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाच्या बहुतेक संशोधन संस्थामध्ये पीएचडीचे संशोधन करणाऱ्यांना किमान १८ हजार रूपये शिष्यवृत्ती दिली जाते मात्र हाफकिन संशोधन केंद्रात पीएचडी करणाऱ्यांना फक्त तीन हजार रूपये देण्यात येत असून विद्यमान संचालकांनी सदर शिष्यवृत्ती बंद करण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शिष्यवृत्ती बंद करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदर शिष्यवृत्तीमध्ये वाढ करून पुन्हा सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (३१-०३-२०१७) :(१) होय, याबाबतची बातमी दैनिक लोकसत्ता या वृत्तपत्रात दि. १६/१०/२०१६ रोजी प्रसिध्द झाली आहे.

(२), (३) व (४) हाफकिन संस्थेमध्ये पी.एच.डी. संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना देण्यात येत असलेली शिष्यवृत्ती अत्यल्प असल्याने ती तात्पुरती बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. दि. ०५/१२/२०१६ अन्वये या विद्यार्थ्यांना दोन वर्षासाठी दरमहा रु.८०००/- इतकी शिष्यवृत्ती देण्याचा निर्णय घेण्यात आला.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

नेवासा (जि.अहमदनगर) तालुक्यातील अंगणवाड्यामध्ये शालेय पोषण आहाराच्या योजनेत झालेला गैरव्यवहार

(४३) ७०३६४ (१०-०१-२०१७). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) : सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेवासा (जि.अहमदनगर) तालुक्यातील ग्रामस्थांनी अंगणवाड्यामध्ये शालेय पोषण आहाराच्या योजनेत गैरव्यवहार होत असून तसेच आहार न देता केवळ खोटी देयके अदा केली दिली जात आहेत अशा तक्रारी केल्या असून या बाबत दिनांक ६ सप्टेंबर, २०१६ रोजी पंचायत समिती येथे उपोषण व आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बाबत शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार काय कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (११-०५-२०१७) :(१) नेवासा (जि.अहमदनगर) तालुक्यातील ग्रामस्थांनी उपोषण व आंदोलन केले आहे, हे खरे आहे.

तथापि, आहार न देता केवळ खोटी देयके अदा केली जातात याबाबत तपासणी केली असता चौकशीअंती कोणत्याही प्रकारची पोषण आहाराची खोटी देयके अदा केलेली नाहीत. तसेच कोणताही गैरव्यवहार झालेला नाही.

(२) होय, चौकशी करण्यात आली आहे.

याबाबत एकात्मिक बाल विकास प्रकल्प, नेवासा कार्यालयाकडून तालुक्यातील अंगणवाडी केंद्रास दि.१२.०९.२०१६ ते १४.०९.२०१६ या कालावधीमध्ये भेट देऊन आहाराबाबत तपासणी केलेली आहे. शासनाने ठरवून दिलेल्या पाककृती प्रमाणे सदर अंगणवाडी केंद्रात नाष्टा व जेवण असा दोन्ही प्रकारचा आहार देण्यात आलेला आहे असे निदर्शनास आले आहे.

सदर तक्रार असणाऱ्या अंगणवाडी केंद्रावरील सेविकेस आहाराबाबत तक्रारीची चौकशी केली असता सदर दिवशी काही अपरिहार्य कारणास्तव आहार उशिरा प्राप्त झाल्यामुळे आहार दिल्याचे तक्रारदार पालकांनी मुलांना पोषण आहार मिळत नसलेबाबतची तक्रार केलेली आहे. याबाबत संबंधित अंगणवाडी सेविकेस नोटीस बजाविणेत आलेली आहे. तसेच संबंधित कार्यक्षेत्रातील पर्यवेक्षिकेस कामकाजामध्ये सुधारणा करणेबाबत नोटीस देण्यात आलेली आहे.

(३) विलंब झालेला नाही.

लातूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सर्वोपचार रुग्णालयातील गैरसोयीबाबत

(४४) ७१०९५ (१६-१२-२०१६). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सर्वोपचार रुग्णालयात गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या महाविद्यालयातील एमआरआय आणि कलर-डॉपलर यंत्रणा केवळ वातानुकुलीत यंत्रणा बंद असल्याच्या कारणावरुन बंद ठेवण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या महाविद्यालयातील कलर-डॉपलर मागील वर्षभरापासून बंद असल्याने तपासणीसाठी खाजगी रुग्णालयांकडे पाठविले जाते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय चौकशीनुसार कोणती कार्यवाही करणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०४-०२-२०१७) :(१) व (२) हे अंशत: खरे आहे.

वातानुकुलीत यंत्रणा बंद झाल्यामुळे फक्त एम.आर.आय. यंत्र काही कालावधीसाठी बंद होते. या कालावधीत सी.टी.स्कॅन मशीनवर स्कॅनींग करुन रुग्णसेवा कार्यान्वित ठेवण्यात आली होती. वातानुकुलीत यंत्रणा तातडीने खरेदी करुन एम.आर.आय. यंत्र रुग्णसेवेत कार्यान्वित करण्यात आले आहे.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

दि चिल्ड्रन्स एड् सोसायटी, मुंबई या संस्थेला शासकीय बालगृहाचा दर्जा देऊन सदर संस्था राज्य शासनाकडे विलिनीकरण करण्याबाबतचा प्रस्ताव

(४५) ७१११९ (२७-०१-२०१७). श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) : सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दि चिल्ड्रन्स एड् सोसायटी, मुंबई या संस्थेला शासकीय बालगृहाचा दर्जा देऊन सदर संस्था राज्य शासनाकडे विलिनीकरण करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधिंनी दिनांक २२ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री तसेच मा.महिला व बालविकास मंत्र्याकडे पत्रव्यवहाराद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासन स्तरावर काय निर्णय घेण्यात आला आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (१९-०४-२०१७) :(१) दि चिल्ड्रन्स एड सोसायटी एम्प्लॉईज युनियन, मुंबई यांनी दि. ०१ जानेवारी, २०१६ रोजी संस्था व कर्मचारी यांचे सेवाबाबतच्या समस्यांच्या अनुषंगाने संस्था शासनामध्ये विलिनीकरण करण्याचा प्रस्ताव शासनास सादर केलेला आहे.
(२) होय.

(३) प्रस्ताव विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

उमरखेड (जि.यवतमाळ) येथे स्व.उत्तमराव पाटील, वन उद्यान या प्रकल्पाच्या प्रस्तावास वाढीव निधी उपलब्ध करुन देण्याचे निवेदन

(४६) ७१८२७ (०९-०१-२०१७). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उमरखेड (जि.यवतमाळ) येथे स्व.उत्तमराव पाटील, वन उद्यान या प्रकल्पाच्या प्रस्तावास वाढीव निधी उपलब्ध करुन देण्याचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.वने, वित्त व नियोजन मंत्री यांना माहे जुलै, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार (०२-०३-२०१७) :(१) होय.
(२) स्व.उत्तमराव पाटील, जैवविविधता व निसर्ग संवर्धन केंद्र, मौजे आंबवन, कक्ष क्र. ७५७ सर्व्हे नं. १ ता.उमरखेड, जि.यवतमाळ येथील एकूण १० हेक्टर क्षेत्रात सामाजिक वनीकरण विभाग, यवमाळ परिक्षेत्र, उमरखेड अंतर्गत घेण्यात आले आहे. सदर उद्यानाचा डिपीआर मंजूर असून, मंजूर रक्कम रुपये १२२.०० लाख इतकी आहे. सन २०१५-१६ मध्ये रु. ४६.४० लाख, सन २०१६-१७ मध्ये रु. ४२.३० लाख रकमेची कामे आराखड्याप्रमाणे प्रगतीपथावर आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

वैद्यकीय आणि दंत वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेबाबत

(४७) ७१८३१ (१६-१२-२०१६). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), डॉ.आशिष देशमुख (काटोल) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वैद्यकीय आणि दंत वैद्यकीय अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया मार्गी लागली असली तरी वैद्यकीयच्या आयुर्वेदिक, होमिओपॅथिक, युनानी, नर्सिग आदि विविध शाखांच्या तब्बल ५० टक्के महाविद्यालयांची मान्यता येण्यास विलंब झाल्याने अभ्यासक्रमांच्या प्रवेशतांचे नुकसान होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यात वरळी येथील पोद्दार महाविद्यालयाबरोबरच नांदेड, नागपूर, उस्मानाबाद येथील सरकारी महाविद्यालयांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू शाखांच्या महाविद्यालयांची मान्यता अद्याप रखडण्याची कारणे काय,
(४) असल्यास, सदरहू शाखांना मान्यता देऊन अभ्यासक्रमांचे प्रवेश खुले करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करणार आहे ?

श्री. गिरीष महाजन (१७-०४-२०१७) :(१) नर्सिंग अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांची मान्यता विलंबाने प्राप्त झालेली नसून केंद्र शासनाच्या आयुष मंत्रालय नवी दिल्ली यांनी काही आयुर्वेद, युनानी व होमिओपॅथी महाविद्यालयांना विलंबाने मान्यता दिली आहे. मात्र, त्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान झालेले नसून सर्व मान्यताप्राप्त महाविद्यालयातील प्रवेश हे केंद्र शासनाने विहीत केलेल्या मुदतीमध्ये करण्यात आलेले आहेत. सर्व पात्र विद्यार्थ्यांना त्यांचे गुणानुक्रमानुसार व पसंतीनुसार प्रवेश देण्यात आलेले आहेत.
(२) होय, हे खरे आहे. पोद्दार आयुर्वेद महाविद्यालयास माहे ऑक्टोबर, २०१६ च्या सुरुवातीस आणि नांदेड, नागपूर, उस्मानाबाद येथील शासकीय आयुर्वेद महाविद्यालयांना माहे सप्टेंबर, २०१६ अखेरीस मान्यता मिळालेली आहे.
(३) व (४) काही शासकीय तसेच खाजगी महाविद्यालयांना उशिरा मान्यता प्राप्त झाली असली तरीही राज्य शासनामार्फत आवश्यकतेनुसार तत्परतेने मान्यता प्रदान करण्यात आल्या आहेत. तसे, सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षासाठी आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांच्यामार्फत केंद्र शासनाने विहीत केलेल्या प्रवेश बंद दिनांकांच्या (cut off date) कालावधीपर्यंत वेळोवेळी प्रवेश प्रक्रिया राबविण्यात आली आहे. सर्व मान्यताप्राप्त आयुर्वेद, युनानी व होमिओपॅथी महाविद्यालयांच्या पदवी अभ्यासक्रमाच्या जागा उक्त प्रवेश प्रक्रियेद्वारे भरण्यात आल्या आहेत.

साटंबा (ता.हिंगोली) येथील अंगणवाडीमध्ये धान्यात मोठ्या प्रमाणात अळ्या व किड आढळून आल्याबाबत

(४८) ७२०६५ (१०-०१-२०१७). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) : सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) साटंबा (ता.हिंगोली) येथील अंगणवाडीमध्ये पोषण आहारासाठी उपलब्ध असलेल्या धान्यात मोठ्या प्रमाणात अळ्या व किड आढळून आल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या घटनेमुळे अंगणवाडीत शिक्षण घेत असणारे गरजू मुला-मुलींचे आरोग्य धोक्यात येत असल्यामुळे तेथील ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ही गंभीर बाब लक्षात घेता शासनाने संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (१२-०५-२०१७) :(१) अंशत: खरे आहे.
(२) प्रकरणात सदर गावातील ग्रामस्थांकडून तक्रार प्राप्त झालेली आहे.
(३) वरील प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करुन अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन संबंधिताचे १५ दिवसाचे मानधन कपाती बाबतचा दंड ठोठावण्यात आलेला आहे. तसेच संबंधित पर्यवेक्षिका यांना कारणे दाखवा नोटीस देऊन ताकीद देण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

हिंगोली जिल्हयात १९६ अंगणवाड्यांना इमारत नसल्याबाबत

(४९) ७२०७८ (१०-०१-२०१७). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) : सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्हयात १९६ अंगणवाड्यांना इमारत नसल्याने त्या शाळेच्या आवारात किंवा समाज मंदिरात व उघड्या जागेवर भरविल्या जात असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हिंगोली जिल्हया अंगणवाडीच्या इमारती बांधकामासाठी दोन वर्षापासून डीसीआर बदलून मिळेना, ९७ अंगणवाड्यांच्या इमारतीचे बांधकाम अर्धवट, ६९ अंगणवाड्यांसाठी जागाच नाही व जागा असूनही २७ अंगणवाड्यांसाठी इमारती नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (१८-०४-२०१७) :(१) हिंगोली जिल्हयातील एकूण १०८९ मंजूर अंगणवाडी केंद्रांपैकी सद्य:स्थितीत ९६८ केंद्राची इमारत बांधकामे पूर्ण झालेली असून उर्वरित १२१ अंगणवाडया शाळेच्या इमारतीत, समाजमंदिरात, इत्यादी ठिकाणी भरविण्यात येतात. तथापि उघडयावर अंगणवाडया भरविण्यात येत नाहीत.
(२) व (३) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय दिनांक २९ जानेवारी, २०१४ नुसार अंगणवाडी केंद्र इमारत बांधकामासाठी निश्चित नमुना आराखडा मंजूर करण्यात आलेला असून त्यानुसार बिगर आदिवासी क्षेत्रात रु.६.०० लाख व आदिवासी क्षेत्रात रु.६.६० लाख पर्यंत खर्च करण्यास मान्यता देण्यात आली आहे. सद्य:स्थितीत हिंगोली जिल्हयातील ४९ अंगणवाडी इमारतींची बांधकामे प्रगतीपथावर असून ४८ ठिकाणी अंगणवाडी केंद्राच्या बांधकामासाठी जागा उपलब्ध झालेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील झोपडयांमध्ये वास्तव्य करणाऱ्या महिलांचा आर्थिक विकास करण्याकरीता लघुउद्योग वा कुटीरउद्योग सुरु करण्याबाबत

(५०) ७२१०५ (१०-०१-२०१७). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) : सन्माननीय **महिला व बाल विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील झोपडयांमध्ये वास्तव्य करणाऱ्या महिलांचा आर्थिक विकास करण्याकरीता लघुउद्योग वा कुटीरउद्योग सुरु करण्याकरीता शासनस्तरावर कोणती योजना आखण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे,

(२) असल्यास, महिला व बालविकास विभागामार्फत तसेच अल्पसंख्यांक विभागाच्या मदतीने कोणत्या योजना वा उपक्रम राबविले जात आहेत,

(३) नसल्यास, सदर महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (१९-०४-२०१७) :(१) व (२) फक्त मुंबईतील झोपड्यांमध्ये वास्तव्य करणाऱ्या महिलांसाठी अशी कोणतीही वेगळी योजना या विभागाकडे राबविली जात नाही व प्रस्तावितही नाही.

तथापि, सद्यस्थितीत अल्पसंख्यांक विकास विभागामार्फत मुंबईतील झोपडयांमध्ये वास्तव्य करणाऱ्या अल्पसंख्यांक प्रवर्गातील महिलांचा विकास करण्याकरीता दि. २८.२.२०१२ रोजीच्या शासननिर्णयानुसार महिला आर्थिक विकास महामंडळाला महाराष्ट्रातील १० जिल्ह्यांमध्ये १३ वस्त्यांमध्ये लोकसंचलित साधन केंद्र स्थापन करण्यात आलेले आहे. चांदिवली, ट्रॉम्बे व धारावी या तीन शहरांमध्ये लोकसंचलित साधन केंद्र स्थापन करण्यात आलेले आहे. सदर केंद्रामार्फत बचत गट बांधणी व बचत गटांमार्फत महिलांची क्षमतावृध्दी करण्याची कार्यनिती आखण्यात आलेली आहे. बचत गट हे तंत्र वापरुन महिलांचा सर्वांगीण विकास साधण्याचे ध्येय ठेवण्यात आलेले आहे. सद्यस्थितीत या तीन केंद्रामार्फत मुंबई जिल्हयामध्ये एकूण ५५२ इतके बचत गट स्थापन करण्यात आलेले असून त्यामध्ये एकूण ६१२२ एवढया महिलांचे संघटन उभे करण्यात आलेले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.